# प्रकरण पहिले

## डॉ.जे.पी.नाईक यांचा जीवनवृत्तांत

## प्रकरण पहिले

### डॉ.जे.पी.नाईक यांचा जीवनवृत्तांत --

आंतरराष्ट्रीय किर्तिचे शिक्षणतज्ज्ञ ,इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे या संस्थेचे संस्थापक, भारत सरकारचे माजी शैक्षणिक सल्लागार, युनेस्कोमधील शिक्षणवेत्ता समिती मधील भारताचे प्रतिनिधि, कोठारी आयोगाचे माजी सदस्य अशा विविध पदावर काम केलेले डॉ.पद्मभूषण जे.पी.नाईक ( सन १९०७ ते १९८१ ) हे सर्व भारतीयांचे आदराचे व्यक्तिमत्व होते. जे.पी.नाईक हे मूळचे कोल्हापूर जिल्ह्यातील, त्यांचे सुरुवातीचे शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातच झाले. सुरुवातीला स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी हिरिरीने भाग घेतला व आपल्या सामाजिक कार्यास सुरुवात केली. परंतु खरे त्यांचे कार्य शैक्षणिक क्षेत्रातील आहे. म्हणूनच त्यांची कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी या ग्रामीण भागात मौनी विद्यापीठाची स्थापनेत त्यांचा सहभाग मोठा होता. आणि शिक्षण प्रसारातून समाजपरिवर्तन कसे घडवून आणता येईल याची मुहूर्तमेढ रोवली. त्याच बरोबर सन १९४२ ते १९४९ ह्या काळात कोल्हापूर संस्थानच्या सेवेत नोकरीला असताना त्यांनी अनेक योजना कार्यान्वित करुन सुंदर कोल्हापूर कसे करता येईल त्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. जे.पी.नाईक यांचे शैक्षणिक कार्य विशाल आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक समित्यांवर काम केलेले आहे. त्यांची ग्रंथ रचना ही विपूल आहे. परंतु त्यांच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी जे कोल्हापूर संस्थानात भरीव सामाजिक व शैक्षणिक कार्य केले त्याची फारशी दखल अभ्यासकांनी घेतलेली दिसून येत नाही. म्हणून मी या लघु शोध-प्रबंधाला

जे.पी.नाईक यांचे कोल्हापूर मधील कार्य

हा विषय निवडलेला आहे. त्यांनी केलेले कोल्हापूरातील कार्य किती महत्वाचे होते हे त्या काळातील कोल्हापूर संस्थानचे वार्षिक अहवाल, कोल्हापूर नगरपालिकेचे रेकॉर्ड त्या काळातील संस्थानचा पत्रव्यवहार, समकालीन वर्तमान पत्रे, मासिके इत्यादी अस्सल कागदपत्राचा अभ्यास करुन हा लघुशोध प्रबंध पूर्ण केलेला आहे. कोल्हापूर शहराच्यादृष्टीने अनेक सुंदर योजना त्यांनी त्या काळी राबिवलेल्या आहेत म्हणूनच आज कोल्हापूर सुंदर दिसते.

या पहिल्या प्रकरणात डॉ.जे.पी.नाईक यांच्या जीवन चरित्राचा धावता आढावा घेतलेला आहे.

जन्म व शिक्षण --

जे.पी.नाईक हे स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत असताना धारण केलेले नांव पण त्यांचे मूळ नांव विठ्ठल हरी घोटगे हे होते. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यावर जयंत पांडुरंग नाईक हे नाव त्यानी धारण केले.

विठ्ठल हरी घोटगे यांचा जन्म कोल्हापूर जिल्हातील आजरा तालुक्यात उत्तूर जवळ भागास भागातील बहिरेवाडी या गावी ५ सप्टेंबर १९०७ मध्ये झाला,[१] त्याची उपलब्ध जन्म पत्रिका खालील प्रमाणे आहे --


श्री विठ्ठल हरि घोटगे

श्री के.जे.पी.नाईक

सप्टेंबर १९०७

श्रावण कृ। शके १८२९

ज.ळ.व.



त्यांना तीन भाऊ व एक बहिण होती. विठ्ठल, गणेश व दत्तात्रय अशी या तीन भावांची नावे व बहिण अनुसया उर्फ राधाबाई हिला बेळगांव जवळ बैलहोंगल येथे विवाह करुन दिली होती.

घरच्या आत्यंतिक गरिबीमुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण चौथी पर्यन्त बहिरेवाडी येथे झाले व पुढील शिक्षण सातवीपर्यन्त बैलहोंगल येथे झाले. जे.पी.नाईक यांना शिक्षणाची ओढ होती ती जाणून इतर नातेवाईकांनी सहानुभूती पलिकडे काही मदत केली नाही. बहिणीला मात्र घरच्या गरिबीमुळे विठ्ठलचे ( जे.पी.नाईक ) आयुष्य गुरे राखणे, मोलमजूरी करण्यात फुकट जावे हे पटले नाही व त्यांनी भावास बैलहोंगल या गावी आणले. त्यांचे पती श्री कृष्णाजी मंत्री हे कापसाच्या गाठी बांधण्याचा दुकानात लेखनिकाचे काम करत होते. यात फारसे उत्पन्न मिळत नसूनही या पती पत्निने दुबळा आधार विठ्ठलास दिला. बैलहोंगल येथे मेव्हण्या बरोबर काम करीत शिक्षण सातवी पर्यन्त पूर्ण केले. सातवी इयत्तेस त्यावेळी मुलकी परीक्षा म्हणत.[२] कारकुनाची नोकरी मिळवायला त्यांचा उपयोग होई. याच उद्देश्याने एक गृहस्थ घोटगे यांना बेळगांवला घेऊन गेले. असामान्य बुध्दिमत्ता असलेल्या नाईक यांनी मुलकी नंतर एक वर्ष अभ्यास करुन इंग्रजी चौथीत दाखल होता येते हे जाणून श्री कृ.बा.परांजपे या गुणग्राही व कनवाळू शिक्षकावर व त्यांचे मार्फत बेनौन स्मिथ हायस्कूलच्या (बेळगांव ) मुख्याध्यापकावर छाप पाडून अवघ्या चार महिन्यात तयारी करुन इंग्रजी चौथीची परीक्षा सन १९२१ ला दिली.[3] व पहिला नंबर मिळविला. दोन वर्षात व्हावयाचा अभ्यास केवळ चार महिन्यात साध्य केला. चौथीला परीक्षेनंतर जी नादारी व शिष्यवृत्ती मिळाली ती कायम मिळू लागली. इ.स.१९२४ मध्ये मॅट्रिकची परीक्षा ते उत्तीर्ण झाले.[४] सहावीपर्यन्त अर्धमागधी घेतली होती. पण स्कॉलरशिपला संस्कृत घेणे चांगले हे लक्षात घेऊन मॅट्रिकला संस्कृत विषय घेतला. या विषयात प्रथम येणाऱ्यास मुंबई विद्यापीठाची शंकरशेट ची स्कॉलरशिप थोडक्या मार्कांने हुकली पण अकबरनीस ही स्कॉलरशिप मिळाली.

महाविद्यालयीन शिक्षण --

प्रथम कर्नाटक कॉलेज, धारवाड येथे महाविद्यालयीन शिक्षण सुरु झाले. आर्थिक अडचणींमुळे विठ्ठल हरी घोटगे यांनी राजाराम कॉलेजच्या इंटर आर्टस च्या वर्गात प्रवेश घेतला. एखाद्या खेड्यातून आल्यासारखा व बावळट दिसणाऱ्या विद्यार्थ्याकडे त्याकाळी फारसे कुणी लक्ष दिले नाही. पण कोणत्याही विषयाचे प्राध्यापक वर्गावर आले की त्यांना असे काही अवघड प्रश्न व शंका विचारी की ते सर्व अडचणीत येत. जेव्हा एखादा प्राध्यापक वेळाने येई किंवा वर्गाला येत नाही ही संधी साधून तो विषय घोटगे ( जे.पी.नाईक ) असा काही समजून आणि खुलवून सांगत की त्या संबंधिच्या प्राध्यापकाचे पुढे झालेले लेक्चर फिकेच वाटायचे. घोटगे यांची गणना विशेष बुध्दिमान स्कॉलर म्हणजे जीनियस ( Genesis ) या जातीतच केली पाहिजे.`[5]

प्रशासन व घटना असा एक इंटर आर्टसला विषय होता. कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.सीतारामय्याच्या हे तो विषय शिकवित ते तासाला आले नाहीत ही संधी साधून घोटगे ( जे.पी.नाईक ) थेट प्राध्यापकाच्या खुर्ची वर जाऊन त्यानी त्या विषयाचा वर्ग घेतला तो इतका प्रभावी व सुबोध की प्राध्यापकाचे तास फिके वाटावेत ही बातमी विपर्यासाने सितारामय्या यांच्या कानावर गेली.वर्गाची शिस्त मोडलीच पण आपला उपमर्द केला अशी तक्रार प्राचार्य बाळकृष्ण यांचेकडे सितारामय्या यानी केली. घोटगेना ( जे.पी.नाईक ) सितारामय्याची माफी मागावी किंवा कॉलेजमधून काढण्यात येईल अशी नोटीस काढण्यात आली. गणित हा नाईक यांचा ऐच्छिक विषय होता, या विषयाचे विद्वान प्राध्यापक डॉ.सेन यांनी प्राचार्य डॉ.बाळकृष्ण यांना पटवून दिले की इंटर आर्टसला गेल्या कित्येक वर्षात राजाराम कॉलेजला फर्स्टक्लास आला नाही. घोटगे फर्स्टक्लासमध्ये येईल या युक्तिवादाने

डॉ. बाळकृष्ण यांनी त्यांना कॉलेज मध्ये ठेवले पण सितारामय्यानी अट घातली कॉलेजमध्ये घोटगे ( जे.पी.नाईक ) वर्गात बसता कामा नये. नोटीस माघार घेण्यात आली व संबंध युनिव्हर्सिटीत दोनच फर्स्टक्लास आले त्यात घोटगे ( जे.पी.नाईक ) हे एक होते.

घोटगे यांचा विषय गणित तो विषय तर त्याचा तयार असायचा इतर विषयांही ते लक्ष घालीत. ऐन परीक्षेच्या वेळी सुध्दा अभ्यासात गढून न जाता इतर विषयाच्या सहकारी विद्यार्थ्यांना मुक्तकंठाने मदत करायचे. बी.ए.विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टिकोणातून इतिहास विषयावर दिलेली व्याख्यानमाला ( मोगल पीरियड डॉ. बाळकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली) घेतली हे त्यांच्या बुध्दिमत्तेची जाणीव देण्यास पुरेसे आहे.

' कोल्हापूरच्या सारस्वत बोर्डिंगमध्ये ते रहात स्वतः इंटरला असून बी.ए.,बी.एससी.वर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी व गणित विषय शिकवायचे.'[६] एकदा तर परीक्षा जवळ आल्या जे.पी.नाईक आजारी होते पण विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून झोपूनच विद्यार्थ्यांना त्यानी शिकविण्याचा तास घेतला. ( १९३७ )

बी.ए.परीक्षेच्या वेळी दररोज ताप येत होता. पहिले चार पेपर्स कसेबसे दिले व पाचवा पेपरला ते बसले नाहीत पण पहिल्या चार पेपर्सवरच ऑनर्स मिळाला. परीक्षेस लावलेल्या विषयाचा अभ्यास करुन प्राविण्य संपादन केले व त्या व्यतिरिक्त विविध विषयांचे वाचन करीत गमतीने ते जर्मन शिकले व काहींना शिकविले ही मुख्यतः कुशाग्रबुध्दी व अचाट स्मरणशक्तीमुळे अनेक विषय ते अभ्यासू शकले. ' एखादी गोष्ट वाचली की ती विसरणे मला अशक्यच होते, तो माझा दोषच आहे असे नाईक विनोदाने नेहमी म्हणत.' [७]

सन १९६२ च्या सुमारास एका संस्कृतच्या स्कॉलर विद्यार्थ्याची व नाईक याची गाठ पडली तेव्हा त्यानी संस्कृतच्या व्याकरणासहित सर्व आर्ष ( irregular ) रुपे विचारुन त्याची अशी काही

चांचणी घेतली की तो विद्यार्थी चांगलाच बावरला म्हणजे ४० वर्षांपूर्वीच अभ्यासक्रमात वाचलेल्या रुदा गोष्टीही नाईक यांच्या लक्षात होत्या.

कॉलेज जीवनात शिक्षण सुरु असताना ते विद्यार्थ्यांच्या शिकवण्या घेत व स्वत:चा व त्या बरोबर गरीब होतकरु विद्यार्थ्यांचा खर्च चालवित.

## स्वातंत्र्य चळवळीतील कार्य व तुरुंगवास --

मार्च १९३० मध्ये गांधीजींनी मीठ सत्याग्रह सविनय कायदेभंग मोहिम सुरु केली. काही काळ महात्मा गांधी व इंग्रज सरकार यांच्यात समझोता होऊन गांधीजी राऊंड टेबल कॉन्फरन्सला गेले पण सरकारने आपली वचने पाळली नाहीत, म्हणून सन १९३१ मध्ये पुन्हा स्वातंत्र्य लढा सुरु झाला व देशभक्तीने प्रेरित होऊन घोटगे हेही नुकतीच राजाराम महाविद्यालयात लागलेली नोकरी सोडून सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी झाले. त्याना अटक करण्यात आली व बेल्लारी येथील तुरुंगात रवानगी झाली. एक वर्षाहून अधिक काळ ते तुरुंगात होते. या काळात जेलरवर छाप टाकून तुरुंग खात्याच्या काही सुधारणा सुचविल्या म्हणजे अहवाल तयार करुन दिला व तो जेलर सरकार दरबारी मोठा कर्तबगार ठरुन त्या जेलरला अनपेक्षित बढती मिळाली. जेल मधल्या रुग्ण कैद्याची त्यांनी सुश्रुषा केली व गरजे - पुरते डॉक्टरी विद्येचे ज्ञान संपादन केले ते इतके की ज्या धारवाड परिसरातील खेड्यातून नाईकांनी काम केले त्यांना डॉक्टर म्हणून ओळखू लागले. योगायोगा असा की याच धारवाड - कर्नाटक विद्यापीठाने, डी.लिट्. डॉक्टरेट ही पदवी देऊन नाईक यांच्या कार्याचा गौरव केला.[८] सन १९६८ ला कर्नाटक विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉज ही सन्माननीय पदवी त्यांना बहाल केली.[९]

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात तुरुंगात असताना आत्मीयचिंतनातून व ग्रामीण जनतेची सेवा ही आपली कार्यक्षेत्रे ठरविण्याचा निर्णय त्यांना

घेता आला. तुरुंगातील रुग्णालयात चीफ ऑर्डरली म्हणून त्यांनी काम केले. त्यातून औषधोपचाराचे व रुग्ण सेवेचे व्यावहारिक ज्ञान त्याना प्राप्त झाले. स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत होण्याच्या सोईसाठी पूर्वाश्रमीच्या घोटगे ऐवजी जयंत पांडुरंग नाईक हे नवीन नाव त्यानी धारण केले, त्याच नावाने ते कायम ओळखू लागले.

सन १९३२ मध्ये तुरुंगातून सुटून आल्यावर नाईक साहेबांनी धारवाड जिल्ह्यातील उप्पिन बेटीगेरी या खेड्यातील आपल्या जीवन कार्याला प्रारंभ केला. प्राथमिक शिक्षण विनामूल्य, आरोग्य सेवा आणि खादीप्रसार या त्यांच्या जीवन कार्याच्या प्रमुख प्रेरणा होत्या. खेडूत जनतेसाठी दिवसाचे अठरा अठरा तास श्रमत असताना नाईकसाहेबांनी आर्थिक लाभाची किंवा व्यक्तिगत सुखसोईची किंचितही पर्वा केली नाही. किंबहुना त्याचे पुढचे संपूर्ण जीवन निरपेक्ष समाज सेवेचा उत्तुंग आदर्श होता. त्यानी अनेक पदे भूषविली परंतु त्या सर्व जबाबदाऱ्या त्यानी विनावेतन पार पाडल्या. समाजाशी इतके एकरुप झालेले जीवन क्वचितच आढळते. त्यातून नाईक साहेबांना प्रसिध्दिचा किंचितही सोस नव्हता, त्यामुळे या आर्थिक लाभरहित समाज कार्याचा त्यांच्या तोंडून कधीही उल्लेख आला नाही. स्वतः संबंधी कशी साध्य केली होती याचे खरोखरच नवल आहे.

उप्पिन बेटीगेरीमधील गावकरी त्यांना ज्वारीची भाकरी आणि थोडेसे दही नेऊन देत. नाईकसाहेबांना तेवढा आहार पुरेसा होई. त्यांचा मासिक खर्च अवघा पाच रुपये असे. आपल्या येथील वास्तव्याचा गावकऱ्यांवर भार पडू नये या जाणिवेतूनच नाईक साहेबांनी साध्या राहाणिचे व्रत घेतले. आणि ते अखेरपर्यन्त पार पाडले. सन १९३७ मध्ये उप्पिन बेटीगिरी या गावाला ग्रामसुधारणेसाठी ठेवण्यात आलेली सर फ्रेड्रिक साईक्स ( मुंबई राज्य गव्हर्नरच्या नावे ठेवलेली ) ढाल मिळाली. ती नाईकसाहेबांनी या गावाला विकासासाठी केलेल्या अथक परिश्रमामुळेच. [१०]

धारवाड जिल्हातील खेड्यापाड्यामध्ये आरोग्य शिक्षणाचे प्राथमिक शिक्षणाचे प्रौढ शिक्षणाचे व आर्थिक,सामाजिक विकासाचे कार्य केले. धारवाड येथे प्राथमिक शिक्षण प्रसारक मंडळ नावाची एक संस्था स्थापन केली व त्यामार्फत जेथे शाळा नाहीत अशा सुमारे ४० खेड्यातून शाळा स्थापण्यास तेथील लोकांना प्रवृत्त केले. त्यावेळी Voluntary Schools ची स्वत: एक प्राथमिक शाळा चालविली.

## मुंबई राज्यावर शैक्षणिक समितीवर निवड --

इ.स.१९३७ मध्ये मुंबई प्रांतात के.बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यानंतर या सरकारने जे.पी.नाईक यांना मुंबईला बोलावून घेतले.[११] प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण आणि प्रौढ शिक्षणाची प्रसार ही दोन उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी कार्य केले पाहिजे यासाठी त्यांना सल्ला मागितला. तेव्हापासून मुख्यत: या दोन शैक्षणिक प्रश्नावर जे.पी.नाईक यांनी अभ्यास आणि प्रयोग सुरु केला. याच काळात त्यांनी धारवाड जिल्हातील ग्रामीण मागास ३० प्राथमिक शाळा सुरु केल्या. बेसिक एज्युकेशन कमिटी या मंडळावर काम करणेस आमंत्रण व शासकीय नोकर नसलेल्याना शिक्षणतज्ज्ञ म्हणून राज्यस्तरावरील काम जे.पी.नाईक यांना मिळाले. सन १९४० पर्यन्त त्यानी काम केले. शिक्षण संदर्भात सरकारला अनेक उपयोगी सल्ले नाईक यांनी दिले.

## जे.पी.नाईक व कोल्हापूर संस्थान --

इ.स.१९४४ ते १९४७ या काळातील कार्य कोल्हापूर संस्थानचे त्या वेळचे शिक्षण मंत्री रावबहादुर पी.सी.पाटील यांच्या आग्रहावरुन अंशवेळ शिक्षण मार्गदर्शक म्हणून सन १९४४ मध्ये कोल्हापूर येथे जे.पी. नाईक यांना आमंत्रित केले, गेले.[१२]

विद्यार्थ्यांचे अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण व गळती या विषयावर पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या संस्थेने नाईक यांच्या प्रोत्साहनामुळे संशोधन याच काळात सुरु केले.' [१३]

रावबहादूर पी.सी.पाटील हे कोल्हापूर संस्थानात शिक्षण मंत्री होते. त्यामुळे संस्थानच्या शैक्षणिक प्रगतीसाठी एक योजना आसावी असे त्यांना वाटले व त्यानी ही कामगिरी नाईक यांचे कडे सोपविली. केवळ शिक्षणासंबंधीच नव्हे तर संपूर्ण समाज जीवनासंबंधी आस्था असल्यामुळे त्यानी कोल्हापूर संस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी, रीजन्सी कौन्सिलची राजवट सुरु झाली होती. कोल्हापूर संस्थानाचे विकास सचिव म्हणून नाईक यांना नियुक्त करण्यात आले. नाईक यांनी आपले कर्तृत्व सिध्द केले.

सन १९४० ते १९४७ पर्यन्त जे.पी.नाईक यांनी कोल्हापूर संस्थानात शैक्षणिक पुर्नघटनेचे काम वेतन न घेता केले. १८-१८ तास काम करणारा एक आगळा प्रशासक म्हणून ते ओळखले जात.' कोल्हापूर संस्थानात त्यानी अनेकविध सुधारणा केल्या. रेल्वे वाहातुक कारभार,पाणी पुरवठा, वीज निर्मिती, आरोग्य ,सांस्कृतिक जीवन, रस्ता रुंदीकरण या सार्‍या क्षेत्रात त्यांनी आधुनिकीकरण आणले.' [१४]

कोल्हापूर संस्थानाचे मिस्टर मिचेल हे मुख्यमंत्री होते. त्यांचा इंग्रजी वाङ्‌मयाचा खूप अभ्यास होता. एखाद्या साहित्यिकांचे अवतरण घ्यायची त्यांना हुक्की यायची पण क्वचित आठवायचे नाही मग नाईक ती तात्काळ संगायचे. इंग्रजी साहित्यिकाचे वाचन नाईकांच्या तोंडी नेहमी येई.' एके दिवशी संबंध ब्राऊनिंगच नाईकांनी आपल्याला ऐकविल्याची आठवण प्रसिध्द साहित्यिक पु.ल. देशपांडे सांगतात.' [१५]

## जे.पी.नाईक व कोरगांवकर ट्रस्ट आणि मौनी विद्यापीठ —

सन १९४८ ते १९५९ कोरगांवकर ट्रस्ट कोल्हापूर या संस्थेच्या सेवक संघाचे ते सदस्य होते. कोरगांवकर संस्थेतून त्यांनी कार्य केले. भारत १५ ऑगस्ट

१९४७ ला स्वतंत्र झाला आणि भारतातील सर्व संस्थानानी भारतीय संघराज्यात विलिन होण्याची प्रक्रिया सुरु झाली. कोल्हापूर संस्थान १ मार्च १९४९ ला मुंबई राज्यात सामील झाले व नवीन कोल्हापूर जिल्हा अस्तित्वात आला. कोल्हापूर संस्थान मुंबई राज्यात विलीन झाल्यानंतर जे.पी.नाईक हे पुन्हा मुंबईला आले आणि त्यानी शैक्षणिक प्रश्नांच्या संशोधनासाठी के.राममाऊ परुळेकर प्रभू यांच्या सहकार्याने इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन या संस्थेची स्थापना सन १९४८ मध्ये केली. शैक्षणिक समस्यांचा परामर्श घेणारी त्यावेळी ती भारतातील एकमेव संस्था होती. आणि ४३ वर्षानंतरही तिचे ते स्थान कायम आहे.

मुंबईत शैक्षणिक संशोधनाचे काम करत असतानाही जे.पी.नाईक यांच्या डोळ्यापुढे होता तो ग्रामीण विभाग. त्या विभागाच्या परिसराशी सुसंगत ठरेल असे अध्ययन केन्द्र सुरु करण्याच्या विचारातून त्यानी गारगोटी येथे मौनी विद्यापीठाने उभारलेल्या कार्यास सहभागी झाले.त्यांना आचार्य स.ज.भागवत सारख्या विचारवंताचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. हे सर्व करत असताना त्यानी भारतीय शिक्षणाचा इतिहास हा ग्रंथ लिहिला.[१६]

जे.पी.नाईक यांचा विवाह --

जे.पी.नाईक यांचा प्रथम विवाह वत्सला ( कामत दड्डीकर ) यांची कन्या ) हिचेशी झाला होता. अक्कलकोटला त्या शिक्षिका होत्या.

सन १९५५ मध्ये जे.पी.नाईक यांचा डॉ.चित्राताई नाईक यांच्याशी दुसरा विवाह झाला.[१७] त्यामुळे जे.पी.नाईक यांच्या अस्थिर भ्रमणतीला स्थिरता आली. जे.पी.नाईक यांच्या अनेक योजना व कल्पना यांना मूर्तस्वरुपात कार्य करण्याची चित्राताई यांची तळमळ व जिद्द यांच सहकार्य लाभले. चित्राताईनी लहान मुलांला सांभाळावे तसे सांभाळले. त्यांचा खाण्यापिण्याची, कपड्यालत्याचा सर्वाचीही जबाबदारी चित्राताईनीच घेतली. नाईक हे खादी वापरत. मद्यमांसाला त्यांनी स्पर्श केला नाही. संपूर्ण

आयुष्य दलित व पिडीत तळागाळच्या जनतेच्याच हिताचा त्यांनी विचार केला.

भारत सरकारचे शैक्षणिक सल्लागार --

सन १९५९ पासून जे.पी.नाईक राष्ट्रीय पातळीवर वावरले.[१८] दिल्लीहून आमंत्रण आले व सन १९५९ ते १९७३ या कालखंडात केन्द्रिय मंत्रालयात शिक्षण सल्लागार म्हणून व अनेक साहित्याचा समासद म्हणून कार्य केले. श्रीमाळी, हुमायून कबीर, फक्रुद्दिन अली अहमद, छागला, त्रिगुणसेन, व्ही.के.आर. व्ही.राव, सिध्दार्थ शंकर रे, नुरुल हसन व प्रतापचंद्र चंदर या ओळीने नऊ केन्द्रिय शिक्षण मंत्र्याबरोबर त्यानी काम केले. याच कालखंडात कोठारी शिक्षण आयोगाचा समासद म्हणून सन १९६४ ते १९६६ या कालखंडात कार्य त्यानी केले व त्या अहवालाच्या रचनेत मूलभूत महत्वाचा सहभाग घेतला. सन १९५९ मध्ये त्यावेळचे केन्द्रिय शिक्षण मंत्री डॉ.के.एल. श्रीमाळी व शिक्षण सचिव डॉ. के.जी.सैय्यद्दिन यांनी त्याची भारत सरकारचे प्राथमिक शिक्षण विषयक सल्लागार म्हणून नियुक्ती केली. त्यामुळे जे.पी.नाईक यांचा देशातील व परदेशातील शिक्षण तज्ज्ञाशी आणि समाज विज्ञान क्षेत्रातील अधिकारी व्यक्तीशी परिचय झाला. युनेस्को आणि पॅरिस येथील इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन प्लॅनिंग या शिक्षणविषयक आंतरराष्ट्रीय संघटनेशी नाईक निगडीत झाले. युनेस्को ने त्यांची अशियातील सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाचे सल्लागार म्हणून नेमणूक केली.अशियाई देशांमध्ये प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्यासाठी कोणता कार्यक्रम अनुसरला पाहिजे यासंबंधी नाईक यांनी लिहिलेला अहवाल दिला तो 'कराची योजना' म्हणून प्रसिध्द आहे.[१९]

भारतीय शिक्षणपध्दती आणि परिस्थिती सापेक्ष करण्यासाठी तिच्यात कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत यासंबंधी शिफारसी करण्यासाठी भारत सरकारने सन १९६४ मध्ये शिक्षण आयोग नेमला होता. या आयोगाचे सदस्य, सचिवपद नाईक यांचेकडे आले. हा आयोगाचा अहवाल

बहुतांशी नाईक यांनी लिहिलेला असून त्या अहवालाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेली आहे. नाईक यांनी प्रौढ शिक्षण, प्राथमिक शिक्षण, व अनौपचारिक शिक्षण या विषयांवर पंचवीस इंग्रजी ग्रंथ लिहिले असून या विषयासंबंधिचे ते प्रमाण ग्रंथ मानले जातात. नाईक यांचा या क्षेत्रातील अधिकार किती मोठा होता यावरुन कल्पना येते.

दिल्लीतही गारगोटी सारखीच साधी शहरातील निकेतन काम केले. जगातील नामंवत शिक्षण तज्ज्ञाना जे.पी.नाईक यांचे नाव माहिती नाही असे राहिले नाही. भारतात शिक्षण क्षेत्रात काहीही काम अस्थेने, कर्तृत्वाने करणाऱ्या व्यक्तीचे नाव जे.पी.नाईक यांना माहिती नाही असेही झाले नाही. केन्द्रातून आणि राज्यात शिक्षणमंत्री, शिक्षण खात्याचे सचिव, शिक्षण संचालक, वरिष्ठ अधिकारी या सर्वांना जे.पी.नाईक यांचा परिचय होता व या सर्वांच्याकडे त्याच्या शब्दाला मान होता. अशीच मान्यता त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या परदेशातील संस्थामधून होती.

सन १९६७ ते १९६९ - या कालखंडात त्यानी इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च या संस्थेचा आराखडा मान्य करुन घेतला. सन १९६९ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे ते १९७८ पर्यन्त सभासद सचिव होते. गणित घेऊन बी.ए. झालेल्या जे.पी.नाईक यांना सर्वोच्च श्रेणीच्या भारतातील समाजशास्त्रातज्ज्ञ पितृतुल्य मानतात.

जवाहरलाल नेहरु विद्यापीठ स्थापन करण्यास जे.पी.नाईक यांचा सहभाग मोठा होता. इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च ही संस्था शिक्षणतज्ज्ञ व भिन्न भिन्न सामाजिक शास्त्राचे अभ्यासक, विचारवंत यांच्या सहाय्याने वैचारिक विनीमय घडवून आणण्यात पुढाकार घेणारी ही संस्था स्थापन करुन नाईक यांनी एक मोलाचे कार्य पार पाडले.

सन १९७३ ला भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयातील जबाबदारीतून मोकळे झाल्यानंतर इंडियन इंस्टिटयूट ऑफ एज्युकेशन या संस्थेच्या पुनर्जीवनाकडे ते वळले. त्यांच्या संस्थेच्या कोथरुड येथील कार्यालयीन वास्तूचा उद्घाटन

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

समारंभ २२ फेब्रुवारी १९८१ रोजी उपराष्ट्रपती ह्दिायतुल्ला यांच्या हस्ते साजरा करण्यात आला. प्रकृती बरी नसतानाही १० ते १५ मिनिटे भाषण करुन संस्थेच्या कार्याच्या वाटचालीसंबंधी अनेक अपेक्षा व्यक्त केल्या. सन १९७४ साली भारत सरकारने पद्मभूषण हा किताब दिला.[२०] आशियातील कामाबद्दल अखिल भारतीय आरोग्य परिषदेने त्यांना १९७७ मध्ये डॉ.मुदीलयार अवॉर्ड दिले.[२१] या परिषदेतील त्याचे भाषण हाच सर्वांसाठी आरोग्य हा अहवालाचा पाया आहे. अनेक आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनाचे ते शिक्षण विषयक कार्यात सल्लागार होते.

गरिबीचा अनुभव सतत गाठीला असावा हे देखिल त्यांचे जीवन तत्व असल्याने त्यांनी शासनाकडून दरमहा केवळ एक रुपया वेतन घेऊन त्यांनी स्वत:चा चरितार्थ लेखन आणि व्याख्याने हासाठी मिळणाऱ्या मानधनावर तहात भागविले.सन १९६४ जुलै मध्ये नेमलेल्या शिक्षण मंडळ सर्वच दृष्टीने आगळे होते. युनेस्को सारख्या जगमान्य संस्थेमार्फत यातील सभासदाची निवड करण्यात आली. जगातील नामंवत शिक्षणतज्ज्ञ त्याचे सभासद आहेत. अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठाचा संशोधन शाखेचे डीन, युनेस्कोचे माजी उपसर संचालक जॉन रॅामस, मास्को विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे प्राध्यापक , टोकियो विज्ञान व तंत्र शास्त्र विद्याशाखेचे प्राध्यापक डॉ.जेम्स अलग, अमेरिकेच्या स्टेट एज्युकेशन डिपार्टमेन्टचे कमिशनर व न्यूयार्क राज्य विद्यापीठाचे अध्यक्ष, ब्रिटन उच्चतर शिक्षण समितीचे अध्यक्ष एकाहून एक मोठी मंडळी ज्या समितीत आहेत, त्या समितीचे सर्वांना तळमळीने कार्यास लावणारी प्रेरणा आणि स्वत:च्या अविश्रांत परिश्रमाने तरुणालाही लाजवीणारे मंडळाचे सभासद चिटणीस जे.पी.नाईक हे होते.[२२]

'सम परस्पेटिव्ह्ज ऑन नॉन फॅार्मल एज्युकेशन'हा त्याची १९७७ साली ग्रंथ प्रकाशित झाला. सन १९७९ साली शिक्षणाचा कार्यक्रम पुन्हा मागे पडला. जागरुक लोकसमूह यावरच आता विसंबले पाहिजे असे जे.पी.नाईक म्हणतात. सन १९७७ साली त्यानी त्या संबंधिचे प्रगट चिंतन 'द बिगींन ए

रेव्ह्योल्यूशन विथ ए रेव्ह्योल्यूशन' ही टिपणी लिहून सगळ्यासमोर ठेवली.'[२३]

अशा या थोर आंतरराष्ट्रीय शिक्षण तज्ज्ञाचे घशाच्या कॅन्सरच्या रोगाने दिनांक ३० ऑगस्ट १९८१ पहाटे जे.पी.नाईक यांचे निधन झाले. त्यांच्या हाताखाली तयार झालेल्या,कार्यकर्त्यांनी त्याचे अनौपचारिक शिक्षण व आरोग्य शिक्षण या दोन्हाचे कार्य चालविले आहे. अपुरा राहिलेला ग्रंथ शक्य तितक्या लवकर हातावेगळा करण्याच्यादृष्टीने प्रयत्नांची पराकाष्टा ते करीत होते. शरीर साथ देत नसतानाही अखेर पर्यन्त नवीन ध्यासाला सर्वस्व अर्पण करणारा जे.पी.नाईक यांच्यासारखा कर्मयोगी विरळच.'[२४]

## संदर्भ ग्रंथ सूची


१ वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९८९, पृ.४

२ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.२

३ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.३

४ वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९९१ - पृ.४

५ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.५

६ शिंदे ग.र., देशपांडे पू.ल.-श्रीमान मदन मोहन लोहिया -षष्ट्द्विपूर्ती- - निर्माण अभिनंदन अंक - कोल्हापूर दर्शन - पृ.४७४

७ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.७

८ सकाळ - ३०-८-९१ - पृ.९

९ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.५

१० वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९८१ - पृ.४

११ वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९८१ - पृ.४

१२ दाभोळकर देवदत्त - समाज प्रबोधिनी पत्रिका - जानेवारी-फेब्रुवारी - - १९८२ - पृ.१४

१३ केसरी - ३१-८-८१

१४ साधना अंक - १२-२-१९८१ - पृ.१७

१५ जोशी बाबूराव - कोल्हापूरचे जे.पी.नाईक - पृ.७

१६ माळगावकर मनोहर - छत्रपतीज ऑफ कोल्हापूर - मुंबई,१९७१-पृ.५९६

१७ कागल माधवराव - माझा परिवार - पृ.१८

१८ वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९८१ - पृ.५

१९ वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९८१ - पृ.५

२० नाईक जे.पी. अनौपचारिक शिक्षण का आणि कसे - परिशिष्ट- - पृ.२३

२१ नाईक जे.पी.अनौपचारिक शिक्षण का आणि कसे - परिशिष्ट - पृ.२३

२२ बागल माधवराव - दैनिक सत्यवादी - १०-७-६६

२३ डोंगरे ग.शं. - तरुण भारत - ८-९-८१

२४ वाळिंबे वि.स. - जीवन शिक्षण - सप्टेंबर १९८१.